# समृद्ध वर्गप्रक्रिया आणि शिक्षणाला गती – नॅव्हीगेटरची किमया

हीपरभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यात दिसून आलेली ही बदलाची कहाणी. ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या मदतीने या ठिकाणी मुलांच्या शिक्षणासंबंधी बरंच काम उभं राहिलं आहे. येथील शिक्षकांनी आणि पालकांनीदेखील त्यात फार महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सध्या एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाचा प्रत्येक क्षेत्रात शिरकाव झालेला दिसतो. विशेषतः कोविडनंतरच्या काळात शिक्षण क्षेत्रातदेखील विविध अॅप्स, शिक्षणासाठी सहाय्यभूत ठरणारी तांत्रिक साधने मोठ्या प्रमाणावर दिसून येऊ लागली. मानवत तालुक्यामध्ये सन २०१८पासूनच ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या मदतीने नॅव्हीगेटर टूल वापरण्यात येऊ लागले. त्यामागचा मुख्य उद्देश मुलांचे शिक्षण अधिक गतीने व्हावे आणि शिक्षकांना मदत मिळावी हा होता.

मानवत केंद्रातल्या रत्नापूर येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवीचे वर्ग भरतात. शाळेची पटसंख्या १०२ आहे. श्रीमती निर्मला घारोळे या शाळेतल्या अतिशय उत्साही आणि नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या शिक्षिका आहेत. मुलांचे शिक्षण गुणवत्तापूर्ण व्हावे अशी त्यांना तळमळ आहे. त्या इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या वर्गाला शिकवतात. दोन्ही वर्गांची मिळून पटसंख्या ३१ आहे. स्वतः नवनवीन उपक्रम आखून ते घेणे, इतरत्र कुठे असे उपक्रम होत असतील तर तिथे मुलांना घेऊन जाणे या गोष्टी त्या करत असतात. सन २०२०-२१पासून त्यांनी शिकवताना नॅव्हीगेटरचा वापर करायला सुरूवात केली. त्यासाठी त्यांना ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधींचे मार्गदर्शन मिळाले. सुरुवातीला हा वापर अगदी कमी प्रमाणात होता. मात्र मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार शिकवायचे असेल तर नॅव्हीगेटरची उत्तम मदत होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपल्या वर्गांमध्ये त्या नियमितपणे अध्ययन निष्पत्तीनुसार शिकवण्याचे काम करत होत्या. मात्र आपल्या कामाचं मूल्यमापन करताना त्यांना अडचणी येत होत्या. नॅव्हीगेटरमुळे ही अडचण दूर झाली.

एखाद्या विषयातला कोणताही घटक शिकवल्यावर त्यावर आधारित मूल्यमापन चाचणी नॅव्हीगेटरमध्ये उपलब्ध असते. त्यामुळे शिकवलेले मुलांना किती समजले आहे हे ताबडतोब बघता येते. त्यामुळे याच्या मदतीने मुलांच्या बारीक –सारीक क्षमता पडताळून बघता येऊ लागल्या. हे मूल्यमापन नोंदवल्यावर प्रत्येक मुलाच्या आणि संपूर्ण वर्गाच्या प्रगतीचा अहवाल समोर दिसू लागला. काही मुलांना शिकवलेले समजून घेण्यात अडचण येत असेल तर ते या अहवालात समजून येऊ लागले. अशावेळेस तो विषय अधिक समजावा यासाठी नॅव्हीगेटरमध्ये आणखी काही उपक्रम सुचवलेले असतात.त्यातून प्रत्येक मुलाला तो विषय समजतो आहे याची काळजी घेणे शक्य झाले. तसेच नॅव्हीगेटरमध्ये गणित आणि भाषा विषयांशी संबंधित अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम दिलेले आहेत. त्यातून विविध संकल्पना स्पष्ट करायला मदत होऊ लागली.

श्रीमती निर्मला घारोळे दुसरी व तिसरीचे वर्ग एकत्र घेत असल्याने दोन्ही वर्गांना एकच घटक शिकवतात. नॅव्हीगेटर हा आता त्यांच्या वर्ग प्रक्रियेचा नियमित भाग झालेला आहे. कोणताही घटक शिकवताना त्यासाठीचे उपक्रम,मूल्यमापन चाचणी यांचा त्यांनी आपल्या शिक्षण प्रक्रियेत आवर्जून समावेश केलेला असतो. ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधीने त्यांच्या वर्गाला भेट दिली असता, नॅव्हीगेटरचा वापर सुरू केल्यापासून आपल्या वर्गांमध्ये लक्षणीय बदल दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक मुलाला आपापली क्षमता १००% गाठता येणे शक्य झाले असून त्यांचा आत्मविश्वास चांगलाच वाढला असल्याचेही त्यांनी सांगितले. याचा परिणाम मुलांनी स्वतःहून आनंदाने शिकण्यात झाला आहे आणि शिक्षकांवरचा शिकवण्याचा ताण खूपच हलका झाला आहे असे दिसून आले.

दिनांक: मे २०२३
©: ग्यान प्रकाश फाउंडेशन
2016 पासून एडेलगिव्ह फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन (CTE) प्रोग्राममध्ये शिकलेल्या गोष्टींवर आधारित आहे.